**पत्रकार, संपादक, प्रिन्ट मिडिया, इलेक्ट्रॉनिक मिडिया, सर्व सदस्य यांना विनंती करण्यात येते की, खालील कार्यक्रमाबाबतची माहिती वृत्तपत्रात मध्ये प्रसिध्द करणेबाबत**

# // प्रेसनोट//

# "मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण" या योजनेसाठी मिरा भाईंदर महानगरपालिका सर्व प्रभाग समित्यांमध्ये मदत कक्ष सुरु तसेच BLO कर्मचाऱ्यामार्फत घरोघरी सर्वेक्षण

महाराष्ट्र शासनाच्या महिला व बालविकास विभागाच्या वतीने "मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण" ही योजना सुरु झाली आहे. ही योजना सर्वदूर पोहोचावी आणि जास्तीत-जास्त महिलांनी यांचा लाभ घ्यावा यासाठी मिरा भाईंदर महानगरपालिका आयुक्त तथा प्रशासक श्री.संजय श्रीपतराव काटकर(भा.प्र.से) यांच्या निर्देशानुसार सर्व प्रभाग समिती क्षेत्रात सहाय्यता/मदत कक्ष तयार करण्यात आले असून BLO कर्मचाऱ्यामार्फत घरोघरी जाऊन ऑनलाईन/ऑफलाईन अर्ज स्विकारण्याची कार्यवाही सुरु करणेत आलेली आहे.

त्याअनुषंगे सदर योजनेचा सर्व पात्र गरजू महिलांना लाभ देण्याकरिता प्रत्येक प्रभाग समिती व प्रभाग समितीच्या कार्यक्षेत्रात एकूण 31 ठिकाणी सहाय्यता/मदत सेवा केंद्र स्थापन केले आहे. सदर मदतकक्षामध्ये अर्ज वितरण व स्विकारण्याची व्यवस्था करण्यात आलेली असुन Narishakti Doot app या ऑनलाईन प्रणालीद्वारे अपलोड करणेची कार्यवाही सकाळी 7.00 ते दु.2.00 व दु.2.00 ते रात्री 10.00 या वेळेत आठवडयाचे 7 ही दिवस (शनिवार व रविवार) सह सुरु राहिल.

त्यानुसार सदर सहाय्यता/मदत कक्षाकरिता खालील ठिकाणी प्रभागनिहाय आशा/ अंगणवाडी सेविका, मदतनीस, बचत गट महिला तसेच घरोघरी जाऊन ऑनलाईन व ऑफलाईन अर्ज स्विकारणेकामी BLO कर्मचारी असे एकूण 622 कर्मचाऱ्यांची या कामी नियुक्ती केली आहे.

| अनु.क्र. | तपशिल | सहाय्यता/मदतकक्षाच्या ठिकाणांची नावे |
|---|---|---|
| 1. | प्रभाग क्र.1 | 1) प्रभाग क्र.1 कार्यालय, 2) उत्तन कर विभाग, 3) डोंगरी कर विभाग, 4) राई-मुर्धा कर विभाग |
| 2. | प्रभाग क्र.2 | 1) प्रभाग क्र.2 कार्यालय, 2) मनपा कृष्णा हॉल, शिवसेना गल्ली जनता नगर रोड भा(प), 3) रेशनिंग ऑफीस, गिता नगर, फाटक रोड भाईंदर (प.), 4) महानगरपालिका मुख्य कार्यालय |

| | | |
|---|---|---|
| 3. | प्रभाग क्र.3 | 1) प्रभाग क्र.3 कार्यालय,2) नवघर शाळा क्र.3,<br>3) दत्तमंदिर, नवघर गाव, भाईंदर(पू) 4) केबिन रोड, प्रिन्स प्लाझा, भाईंदर(पू) 5) सरस्वती शाळा सत्यनारायण मंदिर जवळ, भा(पू) 6) जेसलपार्क, पाण्याच्या टाकीजवळ, भा(पू) 7) आर.एन.टि.पार्क, काशिविश्वनाथ मंदिर जवळ भा(पू), 8) बंदरवाडी शाळा, भा(पू) 9) स्वच्छता निरिक्षक कार्यालय, बंदरवाडी, स्मशानभुमी जवळ, भा(पू) |
| 4. | प्रभाग क्र.4 | 1) प्रभाग क्र.4 कार्यालय 2) नगररचना विभाग 3) नविन अभ्यासिका, हनुमान नगर, गोडदेव फाटक रोड, भा(पू) 4) घोडबंदर, कर विभाग, महादेव मंदिर जवळ, घोडबंदर गाव |
| 5. | प्रभाग क्र.5 | 1) प्रभाग क्र.5 कार्यालय 2) स्व.इंदिरा गांधी रुग्णलय, पूनम सागर,कॉम्प्लेक्स, मिरारोड-पूर्व 3) शांती नगर हायस्कूल, सेंटर-2 व शाळा क्र.5 मिरारोड(पूर्व) 4) अजूमण हायस्कुल, नयानगर 5) सेंट हॅरिस हायस्कुल नयानगर |
| 6. | प्रभाग क्र.6 | 1) साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाउु साठे भवन, काशिमिरा 2) चेणा शाळा क्र.10 3) काशिगाव मनपा कम्युनिटी हॉल, 4) श्रीसंत नरहर समाज मंदिर हॉल, पॅराडाईज जवळ 5) आदिवासी ग्रामीण विदयालय |

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रामध्ये “मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण” या योजनेची अंमलबजावणी सुनियोजित व प्रभावीपणे होणेकामी 622 कर्मचाऱ्याची नियुक्ती केली असल्यामुळे कोणतीही गरजू महिला या लाभापासून वंचित राहणार नाही.

वरील ठिकाणी स्थापन केलेल्या सहाय्यता/मदतकक्षा द्वारे जास्तीत-जास्त गरजु महिलांनी या योजनेचा लाभ घ्यावा असे आवाहन मिरा भाईंदर महानगरपालिका आयुक्त तथा प्रशासक, श्री.संजय श्रीपतराव काटकर(भा.प्र.से) यांनी केले आहे.